**अपर पोलीस महासंचालक /संचालक कार्यालय,**
**दळणवळण व परिवहन , महाराष्ट्र राज्य, पुणे.**
डॉ.होमी भाभा रोड, चव्हाणनगर, पुणे ४११००८
दूरध्वनी : ०२०-२५६५६९०८ (कार्यालय), ०२०-२५६५२५० (जनरल),
फॅक्स : ०२०-२५६५७९७४, ईमेल : dirpolwireless.pune@nic.in

क्र.आस्था-२/ई-४/पोलीस शिपाई(क.म)/प्रशासकीय-बदल्या./२०२२/3490 पुणे, दिनांक 30/०९/२०२२

विषय :- पोलीस शिपाई (कर्मशाळा मदतनीस) यांच्या प्रशासकीय बदल्या-२०२२

संदर्भ :- १) महाराष्ट्र पोलीस कायदा १९५१
२) कार्यालयीन प्रस्ताव क्र.ई/प्रलि-२/स.सा.बदल्या/बि.सं.वि./अधिकार/२०२०/८५७, दि.१०/०२/२०२०
३) कार्यालयीन प्रस्ताव क्र.ई/प्रलि-२/स.सा.बदल्या/बि.सं.वि./अधिकार/२०२२/१९६, दि.१७/०१/२०२२
४) इकडील कार्या परिपत्रक क्र.ई/प्रलि-२/कर्मचारी /ससाबदल्या२०२२/१०१२ दि.३१/०३/२०२२

***********

**आदेश:-**

उपरोक्त विषय व संदर्भास अनुसरुन, महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ मधील कलम २२ न (२) मधील विशेषीकृत अभिकरण या सदराखाली पोलीस बिनतारी संदेश विभागाचा समावेश करण्याबाबत शासनास प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. सदर प्रस्तावाच्या मंजुरीस अधीन राहून पोलीस आस्थापना मंडळ यांना प्राप्त असलेल्या अधिकारांचा वापर करुन, गठीत समितीने केलेल्या शिफारशीनुसार, खालील पोलीस शिपाई (कर्मशाळा मदतनीस) यांच्या त्यांचे नावासमोर दर्शविल्याप्रमाणे **प्रशासकीय बदली** करण्यात येत आहे.

**भाग -१ : प्रशासकीय सोयीने बदल्या (विहीत कालावधी पूर्ण झालेले नक्षल ग्रस्त विभाग)**

| अ. क्र. | पोलीस शिपा (कर्म.मदतनीस) यांचे नाव | सध्याचे नेमणुकीचे ठिकाण/ आस्थापना | बदलीवर नेमणुकीचे ठिकाण /आस्थापना |
|---|---|---|---|
| १ | निकोडे भास्कर निळकंठराव | पोलीस अधीक्षक, गडचिरोली | पोलीस अधीक्षक, वर्धा |

२. संबंधित घटक प्रमुखांनी उपरोक्त बदली झालेल्या पोलीस शिपाई (कर्मशाळा मदतनीस) यांना बदलीवर सोडताना पर्यायी / बदलीवर येणा-या पोलीस शिपाई (कर्मशाळा मदतनीस) यांची वाट न पाहता, बदलीवरील नेमणुकीच्या ठिकाणी दिनांक ०७/१०/२०२२ रोजी कार्यमुक्त करावे. तसेच सदर पोलीस शिपाई (कर्मशाळा मदतनीस) यांना बदलीवर कार्यमुक्त केल्याचा अहवाल उलटटपाली या कार्यालयास निश्चितपणे कळवावा.

३. उपरोक्त आदेशान्वये पोलीस शिपाई (कर्मशाळा मदतनीस) यांची बदली ज्या घटक कार्यालयात दर्शविण्यात आली आहे, तेथे सदर पोलीस शिपाई (कर्मशाळा मदतनीस) हजर होण्याची जबाबदारी बदलून गेलेल्या पोलीस घटक कार्यालयाची राहिल, याची नोंद घ्यावी. त्यासाठी त्यांनी पाठपुरावा करावा. विहित वेळेत हजर न होणा-या पोलीस शिपाई (कर्मशाळा मदतनीस) यांचेविरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करावी.

४. संबंधित घटक प्रमुखांनी त्यांच्या घटकात बदलून येणारे जे पोलीस शिपाई (कर्मशाळा मदतनीस) या आदेशानुसार बदलीवर नेमणुकीच्या ठिकाणी हजर होणार नाही, त्यांची नावे कृपया या कार्यालयास कळवावीत. तसेच त्यांच्या घटकातून बदलून जाणारे जे पोलीस शिपाई (कर्मशाळा मदतनीस) बदलीवर हजर होण्याचे टाळून रुग्णनिवेदन करतील अशा पोलीस शिपाई (कर्मशाळा मदतनीस) यांनाही त्यांनी रुग्णनिवेदन केलेल्या दिनांकापासून बदलीवर कार्यमुक्त केल्याचे (deemed relived) दर्शविण्यात यावे आणि त्याबाबतचा अहवालदेखील या कार्यालयास सादर करावा.

30/9

(संजय येनपुरे)
पोलीस उप महानिरीक्षक,
पोलीस दळणवळण व माहिती तंत्रज्ञान विभाग,
महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रति,

पोलीस अधीक्षक, गडचिरोली /वर्धा
पोलीस अधीक्षक बि.सं. पूर्व विभाग नागपूर

प्रत : पोलीस निरीक्षक बि.सं. गडचिरोली /वर्धा
पोलीस निरीक्षक बि.सं. गोनपायो (वेब साईटवर प्रसिध्दीसाठी)